सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website:** www.jdroamt.org
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/परिपत्रक/२०२६/292
दिनांक :- 29 JAN 2026

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित
बीबीए, बीसीए, एमसीए इंटिग्रेटेड इत्यादी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी BCA,BBA व BMS अभ्यासक्रमांमध्ये NRI जागासाठी AICTE कडे मान्यता अर्ज सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE)यांनी प्रसिदध केलेले Approval Process Handbook (APH) २०२४-२७
२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) यांची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मान्यता प्रक्रीयेबाबतची सूचना, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५
३. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/NRI in BBA BCA/२०२५/१११२, दि.२४/१२/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित /खाजगी विनाअनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापिठ नियंत्रित, बीबीए, बीसीए व एमसीए अंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की अखिल भारतीय तंत्रिशाण परिषट नवी दिल्ली(AICTE) यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून Bachelor of computer Applications (BCA), Bachelor of Business Administration (BBA) वBachelor of Management Studies (BMS) हे पदवी स्तरावरील अभ्यासक्रम आपल्या मान्यता प्रक्रियेत समाविष्ट केले आहेत. राज्य सामाजिय प्रवेश परिक्षा कक्ष मुंबई यांच्या मार्फत या अभ्यासक्रमांना एआयसीटीईची मान्यता, राज्य शासनाची मान्यता व संबंधित विद्यापिठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश करण्यात येत आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून अभियांत्रिकी, व्यापस्थापन इत्यादी विविध मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांमध्ये पदवी, पदव्युत्तर व पदविका स्तरावर NRI(Non Resident Indian ) जागांसाठी मान्यता देण्याची तरतूद आहे. BBA,BCA व BMS अभ्यासक्रमांमध्ये NRI जागांसाठी मान्यता मिळाल्यास, संस्थांची जागतिक शैक्षणिक प्रतिमा व दर्जा उंचावण्यास मदत होईल, तसेच NRI विद्यार्थ्यांना नियमनबदध व दर्जेदार शिक्षणाची संधी मिळेल. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी AICTE मान्यताप्राप्त BBA,BCA व BMS अभ्यासक्रम चालवणा-या व NRI प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास इच्छूक असलेल्या संस्थांनी, AICTE च्या Approval Process

Handbook (APH) २०२४-२७ व संबंधित मार्गदर्शक सूचनांनुसार, NRI जागांसाठी मान्यता मिळविण्याकरिता AICTE कडे अर्ज करावा.

NRI जागांसाठी अर्ज सादर करणा-या संस्थांनी Approval Process Handbook (APH) २०२४-२७ नुसार आवश्यक पायाभूत सुविधा, अध्यापनवर्ग व इतर सर्व निकष पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे. NRI जागांचा समावेश करुन "Extension of Approval (EoA) " साठीचे अर्ज AICTE च्या ऑनलाईन पोर्टलवर, मान्यता प्रक्रीयेच्या सूचनेत नमूद करुन केलेल्या कालमर्यादेत सादर करावेत. जेणेकरुन ची मान्यता व शासन मान्यता यांस अनुसरुन राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचे मार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये BBA,BCA व BMS अभ्यासक्रमांमध्ये NRI जागांसाठीचे प्रवेश करणे शक्य होईल.

**सहपत्र :-** वरिलप्रमाणे.

(डॉ. व्हि. आर. मानकर)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४७५/४९२/४७५/४४२/४४३
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

क्रमांक: २/एनजीसी/NRI in BBA BCA /२०२५/ ११९२ दिनांक : 24 DEC 2025

प्रति,
प्राचार्य / संचालक,
AICTE मान्यताप्राप्त BCA, BBA व BMS अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संस्था
महाराष्ट्र राज्य

विषय: शैक्षणिक वर्ष २०२६—२७ साठी BCA, BBA व BMS अभ्यासक्रमांमध्ये NRI जागांसाठी AICTE कडे मान्यता अर्ज सादर करण्याबाबत

संदर्भ: १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) यांनी प्रसिद्ध केलेले Approval Process Handbook (APH) २०२४—२७

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) यांची शैक्षणिक वर्ष २०२६—२७ साठी मान्यता प्रक्रियेबाबतची सूचना, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून Bachelor of Computer Applications (BCA), Bachelor of Business Administration (BBA) व Bachelor of Management Studies (BMS) हे पदवी स्तरावरील अभ्यासक्रम आपल्या मान्यता प्रक्रियेत समाविष्ट केले आहेत. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या मार्फ़त या अभ्यासक्रमांना एआयसीटीईची मान्यता, राज्य शासनाची मान्यता व संबधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फ़त प्रवेश करण्यात येत आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून अभियांत्रिकी, व्यवस्थापन इत्यादी विविध मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांमध्ये पदवी, पदव्युत्तर व पदविका स्तरावर NRI (Non-Resident Indian) जागांसाठी मान्यता देण्याची तरतूद आहे. BCA, BBA व BMS अभ्यासक्रमांमध्ये NRI जागांसाठी मान्यता मिळाल्यास, संस्थांची जागतिक शैक्षणिक प्रतिमा व दर्जा उंचावण्यास मदत होईल, तसेच NRI विद्यार्थ्यांना नियमनबद्ध व दर्जेदार शिक्षणाची संधी मिळेल. या पार्श्वभुमीवर, सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६—२७ साठी AICTE मान्यताप्राप्त BCA, BBA व BMS अभ्यासक्रम चालविणाऱ्या व NRI प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास इच्छुक

शिक्षण
06/01/2026



सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र............दिनांक.........

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. 80 दिनांक 06.01.26

असलेल्या संस्थांनी, AICTE च्या Approval Process Handbook (APH) २०२४—२७ व संबंधित मार्गदर्शक सूचनांनुसार, NRI जागांसाठी मान्यता मिळविण्याकरिता AICTE कडे अर्ज करावा.

NRI जागांसाठी अर्ज सादर करणाऱ्या संस्थांनी AICTE Approval Process Handbook (APH) २०२४—२७ नुसार आवश्यक पायाभूत सुविधा, अध्यापकवर्ग व इतर सर्व निकष पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे. NRI जागांचा समावेश करून "Extension of Approval (EoA)" साठीचे अर्ज AICTE च्या ऑनलाईन पोर्टलवर, मान्यता प्रक्रियेच्या सूचनेत नमूद केलेल्या कालमर्यादेत सादर करावेत, जेणेकरून AICTE ची मान्यता व शासन मान्यता यांस अनुसरुन राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे मार्फत शै. वर्ष २०२६-२७ मध्ये BCA, BBA व BMS अभ्यासक्रमांमध्ये NRI जागांसाठीचे प्रवेश करणे शक्य होईल.

( डॉ.विनोद मोहितकर )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर